# खाते प्रमुख सभा कार्यवृत्त

दिनांक २९.०२.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खाते प्रमुखांची सभा घेण्यात आली. सभेत खालील प्रमाणे कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आल्यात.

**मु.का.अ :-** १. मा. पालकमंत्री ,मा.खासदार व मा.आमदार यांनी पाठविलेल्या पत्र निकाली काढण्यात यावे तसेच तारांकित /अतारांकित प्रश्न निकाली काढण्यात यावे.

२. विभागीय चौकशीचे प्रकरण निकाली काढण्याकरिता सेवा निवृत्त अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात यावी. साप्रवि व शिक्षण विभागाकडील प्रकरणे निकाली काढण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक करावी . सदर कामासाठी येणारा खर्च कार्यालयाचे सादहल मधून करावा

३. बांधकाम विभागाने कामाची यादी ,समाजकल्याण विभागाने वस्ती आराखडा Webside वर टाकावा. तसेच सर्व विभागाने आपल्या विभागाशी संबंधित माहिती Webside वर अपलोड करावी.

४.पंचायत समितीमध्ये होणाऱ्या मासिक सभेला खाते प्रमुख उपस्थित रहावे. उपस्थितीचा तसेच बैठकीचा अहवाल मु.का.अ कडे सादर करावा.

**मु.का.अ :-** पाणी टंचाई बाबत काय स्थिती आहे ?

**का.अ.(ग्रा.पा.पु ) :-** ज्या गावच्या मागण्या टंचाई करिता आले आहेत त्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या कडे पाठविण्यात येईल.

**मु.का.अ :-** भरती प्रकिया पुर्ण झाली आहे काय ?

**उप.मु.का.अ :-** एका उमेदवाराचा आक्षेप असल्यामुळे एका पदाची नियुक्ती आदेश दिले नाहीत.

**<u>जि.आ.अ :-</u>** काही पदामध्ये स्थगिती असल्यामुळे  नियुक्ती आदेश देण्यात आली नाही.

**<u>का.अ (बांध) :-</u>** एका पदाची नियुक्ती आदेश राहिली आहे.

**<u>पशुसंवर्धन अधिकारी :-</u>** सर्व पदाचे नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

**<u>उप मु.का.अ (म.बा.क) : -</u>** सेवा निवृत्त झालेल्या रिक्त पदावर नियुक्त होणार आहे.

**<u>मु.ले.वि.अ :-</u>**

१. अखर्चित निधी शासन खाती जमा करण्यात यावा.

२. माहे एप्रिल पासुन CMP प्रणाली लागू होत असल्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांचे (Bank Details) बँक तपशिल बरोबर आहेत का नाही हे तपासुन घ्यावे.

३. मासिक लेखे व वार्षिक लेखे अप्राप्त आहेत ते पाठविण्यात यावेत.

**<u>मु.का.अ :-</u>** जानेवारी मध्ये प्रकाशीत करावयाच्या सर्व संवर्गात्तील कर्मचाऱ्यांच्य जेष्ठता यादया सा.प्र.वि कडुन तपासुन जि.प.संकेतस्थळावर अपलोड  करण्यात याव्यात.

**मुख्य  कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती.**